REGISTERED No. B 3434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ८ आक्टोबर १९४७ अंक ४१



**आरको**

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ, हमेंढरे बोळाजवळ, पुणें २

**पेडणेकर आणि कंपनी लि.,**


शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८


**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार





## साठे बिस्किटें

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल गिऱ्हाइकांस देण्याची रुखदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

## विविध माहिती

**अमेरिकन इंडिपेंडंट ऑइल कंपनी**—वरील नांवाची १० कोटी डॉलर भांडवलाची एक कंपनी पेट्रोलच्या ११ उत्पादकांनीं मिळून अमेरिकेंत स्थापन केली आहे. अमेरिकेंतील तेलाचा साठा कमी पडूं नये ह्यासाठी तेल आयात करणें, हा कंपनीचा उद्देश आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघटनेंत एकमत झालें**—अमेरिकेंतील आजच्या किंमतीइतक्या चढीच्या किंमती जगांत दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहींत, असें संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभांसाठीं जमलेल्या सर्व प्रतिनिधींचें एकमत आहे. पोलंड व ऑस्ट्रेलिया ह्यांच्यीं कमिट्यांच्या सभांत कुत्र्यामांजरासारखीं भांडणें झालीं, तरी घरच्यापेक्षां अमेरिकेंत लोणी फार महाग असल्याबद्दल त्या दोघांचीहि तक्रार सारखीच तीव्र आहे.

**ब्रह्मदेशांत गोवधाला बंदी**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें एक कायदा मंजूर करून देशांत ता. १५ सप्टेंबरपासून गोवधाला बंदी केली आहे.

**असोशिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन**—ह्या बँकेच्या व्यवहाराची कोर्टाच्या हुकुमतीखाली निरवानिरव करण्याचा हुकूम मुंबई हायकोर्टानें दिला असून, ऑफिशिअल् लिक्विडेटरची बँकेचा लिक्विडेटर म्हणून नेमणूक केली आहे.

**रेल्वेच्या संपाबाबत वाटाघाटी**—मुंबई येथें अखिल भारतीय रेल्वेमेन्स फेडरेशनच्या जनरल कौन्सिलची सभा भरून फेडरेशन व रेल्वे बोर्ड ह्यांच्या मधील वादाचे मुद्दे सोडविण्यासाठीं वाटाघाटी करण्याचें ठरलें. तीन महिन्यांपूर्वी कौन्सिलनें एक ठराव करून संपाबाबत कामगारांचें मत अजमावण्याचें ठरविलें होतें. देशांतील सध्यांची आणीबाणीची परिस्थिति आणि सरकारनें कमी पगाराच्या रेल्वे नोकरांना दिलेल्या सवलती ह्यांचा विचार करून वरील निर्णय घेण्यांत आला आहे.

**हिंदी आगबोट कंपनीला वहातुकीचा वाटा**—इंडिया स्टीमशिप कंपनीनें, ब्रिटिश व कॉंटिनेंटल आगबोट वहातूक कंपन्यांशी नुकताच एक करार केला आहे. ह्या करारान्वयें हिंदुस्थान, ब्रिटन, आणि युरोप ह्या मार्गावरील वहातुकींत वरील कंपनीला वांटा देण्यांत आला आहे.

**मद्रास प्रांतांतील दारूबंदी**—मद्रास प्रांतांतील दारूबंदी आणखी ८ जिल्ह्यांना लागू करण्यांत आली आहे. एकूण २४ जिल्ह्यांपैकीं १६ जिल्ह्यांत आतां दारूबंदी चालू झाली आहे. ऑक्टोबर १९४८ च्या सुमारास उरलेले आठ जिल्हेहि मद्रास सरकारच्या योजनेप्रमाणें दारूबंदीच्या कक्षेंत येतील.

**पागडी घेणारा विरुद्ध कडक इलाज**—मुंबई सरकारनें रेंट कंट्रोल कायद्यांत सुधारणा करण्याचें ठरवून पागडी घेणारा विरुद्ध कडक उपाय योजण्याचें ठरविलें आहे. दुरुस्त बिलान्वयें पागडी घेणाराला पागडी इतकाच दंड आणि कैदेची शिक्षा देण्याचें बंधन कोर्टावर घातलें आहेच. पण ह्याशिवाय ज्या घराच्या बाबत पागडीचा गुन्हा घडलेला असेल ती मालमत्ता जप्त करण्याचा अधिकारहि कोर्टांना देण्यांत आला आहे.

**सरहद्द प्रांतांत शस्त्रांचा कारखाना**—सरहद्द प्रांताचें सरकार आपल्या प्रांतांत शस्त्रास्त्रांचा कारखाना काढण्याचा विचार करीत असल्याचें, प्रांताचे पंतप्रधान मि. अबदुल कायूम खान, ह्यांनीं जाहीर केलें आहे. प्रांतांत शस्त्रें तयार करणाऱ्या कुशल कारागिरांचा भरपूर पुरवठा आहे, असें समजतें.

**अमेरिकेंत गव्हाच्या किंमती चढल्या**—अमेरिकेंत अन्नधान्याच्या वापरांत कपात केल्याशिवाय युरोपकडे मागील वर्षाइतकें धान्य पाठविणें अमेरिकेस अशक्य होईल, असें प्रे. ट्रुमन ह्यांनीं नुकतेच जाहीर केलें होते. त्याचा परिणाम होऊन शिकॅगो येथील बाजारांत गव्हाच्या किंमती बुशेलमागें ४ सेंटनीं आणि मक्याच्या किंमती ३ सेंटनीं वाढल्या. जनावरांना अन्नधान्य खाऊं घालूं नये म्हणून प्रे. ट्रुमन ह्यांनीं शिफारस केली होती. गुरांची पैदास करणाऱ्या हितसंबंधीयांकडून प्रे. ट्रुमन ह्यांच्या वरील शिफारसीला विरोध करण्यांत येत आहे. त्यांच्या मतें, उशिरा झालेली पेरणी व थंडी ह्यामुळें अन्नधान्यें गुरांनाच चारण्याच्या योग्यतेची निपजलीं आहेत.

**पाकिस्तानांतील विमानतळ**—चितगांव, डाक्का आणि सिल्हेट येथील विमानतळ अधिक सुसज्ज करण्याचा पाकिस्तान सरकारचा विचार आहे. ह्या कामासाठीं ४० लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज आहे.


★ बँक ऑफ पूना लि. ★

—शेड्यूल्ड बँक—

हेड ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें २

अधिकृत भांडवल ... .. रु. ५०,००,०००

विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. २५,००,०००

वसूल भांडवल . ... ...रु. १२,५०,०००

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया [ चेअरमन ] २ शेठ दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी. [ व्हा. चेअरमन ], ३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर, एम. ए. पीएच. डी. ४ मि. फ्रामजी पेस्तनजी पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, सोलापूर, ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी.

सेफ डिपॉझिट लॉकरची सोय

() बँक चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारते. चालू खात्यावर १।२ टक्का व्याज. सेव्हिंग्ज खात्यावर १॥ टक्का व्याज.

मुदतीच्या ठेवीचे दर : सहा महिने १॥। टक्के. एक वर्ष २॥ टक्के. तीन वर्षे ३ टक्के.

() मुंबईवरील चेक कमिशन न घेतां स्वीकारले जातात. प्रमुख शहरांवर ड्रॅफ्टस दिले जातात. बाहेरगांवच्या खातेदारांना विशेष सोयी.

() शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक संस्थांना विशेष सवलती.

शाखा : (१) १२ भवानी पेठ, पुणें २, (२) ३६१ सदाशिव पेठ पोस्टासमोर, पुणें २, (३) टिळक चौक, सोलापूर.

जी. जी. साठे
A. B. I. ( London ) मॅनेजर.



सहकारी भांडारांतून विकण्यायोग्य रु. १–१२–० पौंड; सहकारी दुकानास सवलतीचा दर रु. १–९–०

निलगिरी मिक्श्चर
★ चहा ★

सॅंपलकरतां दु आण्याचीं तिकीटें पाठवा.

द. ब. बिनीवाले
५२५ बुधवार, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. ८ आक्टोबर, १९४७



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कंपनीकडून घेतलेलें कर्ज

### डायरेक्टर व मॅनेजिंग एजंट ह्यांच्या संरक्षणाचा मार्ग

ता. १० सप्टेंबरच्या 'अर्था'च्या अंकांत मुंबईच्या एका कंपनीच्या डायरेक्टरांनीं व मॅनेजिंग एजंटांनीं कंपनीकडून कर्जाऊ रकमा घेतल्या व त्यामुळें त्यांचें संचालकत्व कंपनी कायद्याप्रमाणें रद्द व्हावें, अशा स्वरूपाचे बखेडे माजल्याबाबत हायकोर्टांतील दाव्यांची माहिती आली आहे. ह्या दाव्यांत वास्तविक डायरेक्टरांनीं रकमा कर्जाऊ घेतल्या नव्हत्या; कंपनीच्याच कामासाठीं कांहीं पैसे त्यांना आदा करण्यांत आले होते, अशा स्वरूपाचे बचाव देण्यांत आले होते. ह्या अनुरोधानें डायरेक्टरांना अथवा मॅनेजिंग एजंटांना दिलेल्या कोणत्या रकमा "कर्ज" केव्हां समजाव्या व "आगाऊ दिलेले (अडव्हान्सेसचे) पैसे" केव्हां समजावे ह्यासंबंधी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

ह्या बाबतींत डायरेक्टरांनीं अत्यंत जागरूक व दक्ष असावयास पाहिजे. समजा, कंपनीच्या कांहीं कामासाठीं त्यांच्याकडे कांहीं पैसे आले तरी ते वाजवी अवधी पलीकडे त्यांनीं केव्हांहि आपणाजवळ ठेवूं नयेत. जर त्या कामासाठीं लागणाऱ्या सर्वसामान्य वेळेंत तें काम कांहीं कारणांनीं होणार नसेल तर डायरेक्टरांनीं घेतलेली रक्कम स्वतःजवळच न ठेवतां ताबडतोब कंपनीच्या तिजोरींत जमा करावी व पुनः वेळ येईल तेव्हां परत स्वतःकडे आदा करून घ्यावी. कंपनीच्या कामासाठींच घेतलेली रक्कम प्रथम जरी आगाऊ केलेली उचल असली, तरी वाजवी वेळेच्या पलीकडे एक क्षण जरी ती जवळ बाळगली गेली कीं तीच "कर्ज" ठरते आणि कंपनी कायद्याच्या ८६ ड कलमानें अशा कर्जास बंदी केली आहे. ह्याबाबत इंडियन पीनल कोड मधील "मिसअप्रोप्रिएशन"ची व्याख्या व चर्चा अतिशय मार्गदर्शक होण्यासारखी आहे. साध्या डायरेक्टरांना अशा काटेकोरपणानेंच वागणें भाग असून त्यांनीं तसें वागावें असाच कंपनी कायद्याचा मूलभूत हेतू आहे. असें करण्यांत त्याच त्याच रकमेची आवक जावक पुनः पुनः नोंदवावी लागते व थोडा त्रास होतो ही गोष्ट खरी. परंतु अशा पद्धतीनें न वागल्यामुळें प्रसंगी जे बखेडे माजतात व त्रास भोगावे लागतात ते त्यांहून भयंकर व घातकी ठरतात. यास्तव हा सीधा मार्गच थोडा त्रासाचा असला तरी अंतिम हिताचा ठरतो.

मॅनेजिंग एजंटाची या बाबतींतील भूमिका मात्र अनेक अंशानीं डायरेक्टरांच्या भूमिकेपेक्षां पुष्कळच निराळी आहे व कायद्याची योग्य माहिती असेल तर निराळी ठेवता येणें सर्वस्वीं शक्य आहे. कंपनीच्या व्यवहारांतील उलाढालीच्या प्रमाणांत कांहीं रकमा मॅनेजिंग एजंटांकडे राहणें खात्रीनें समर्थनीय व न्याय्य असून ह्या संबंधांत कांहीं सवलती द्यावयास अथवा सोयी करावयास कायद्यामध्यें जरूर वाव आहे. कंपनी कायद्याच्या ८७ ड ह्या कलमाचे पहिले दोन परिच्छेद पुढील प्रमाणें आहेत.

८७ ड (१):—कोणत्याहि कंपनीनें, मॅनेजिंग एजंटाच्या कर्जास गॅरंटी रहाता कामा नये. त्याचप्रमाणें, कोणत्याहि कंपनीनें मॅनेजिंग एजंटाच्या खालील हितसंबंधीयांस कर्ज देतां कामा नये:—

(१) कंपनीचा मॅनेजिंग एजंट, (२) मॅनेजिंग एजंट ही फर्म असल्यास, त्या फर्मचा कोणीहि भागीदार, (३) मॅनेजिंग एजंट ही प्रायव्हेट कंपनी असल्यास, तिचा कोणताहि डायरेक्टर.

८७ ड (२):—कंपनीच्या व्यवहारासाठीं कंपनीनें मॅनेजिंग एजंटाशी काढत्या-घालत्या रकमांचें चालू खातें ठेवलें असल्यास व अशा खात्यांतील शिलकी रकमेची कमाल मर्यादा डायरेक्टर बोर्डानें निश्चित केलेली असल्यास, अशा चालू खात्यांतील बाकीस वरील कलम लागू पडणार नाहीं.

ह्यावरून, कंपनीचे मॅनेजिंग एजंटांना स्वतःकडे चालू खातें ठेवून त्या खात्याच्या हिशोबी कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंतची कंपनीची रकम स्वतःकडे ठेवतां येईल हें उघड होतें. अर्थात् ही मर्यादा डायरेक्टर बोर्डाच्या ठरावानें निश्चित केली गेली पाहिजे. परंतु जर कंपनीच्या आर्टिकलसमध्यें आणि मॅनेजिंग एजन्सीच्या करारनाम्यांतच या बाबतच्या तरतुदी करून घेतल्या तर सर्वच गोष्टी अगदीं उघड व सुरळीत होऊं शकतील. मॅनेजिंग एजंटांप्रमाणें डायरेक्टरांकडे कंपनीची बाकी रहाण्यास मात्र कंपनी कायद्यांत आधार दिसत नाहीं.

---

**अमेरिकन जनतेला इषारा**—वॉल स्ट्रीटमधील पुंजीवाले आणि लष्करशहा ह्यांच्या प्रतिगामी परराष्ट्रीय धोरणामुळें तिसरें महायुद्ध ओढवलें तर अमेरिकेला तें जिंकतां येणार नाहीं असा इषारा अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष मि. हेन्री वॉलेस ह्यांनीं दिला आहे. जर्मनीचें पुनरुत्थापन केलें तर अमेरिकेला फ्रान्सच्या दोस्तीला मुकावें लागेल. ब्रिटनच्या धोरणावरही दडपण आणून फेरबदल करवितां येणार नाहीं आणि अमेरिकेला अशा युद्धांत स्नेही मिळणार नाहींत असें स्पष्टीकरणही त्यांनीं केलें आहे.

**पाकिस्तानचें नभोवाणी केंद्र**—पाकिस्तानचें नभोवाणी केंद्र १९४८ च्या मार्च महिन्यांत सुरू होणार आहे. कराची केंद्राचें प्रतिक्षेपण ढाका, सिंध-हैद्राबाद, पेशावर, लाहोर, इतक्या ठिकाणांहून करण्यांत येणार आहे.

**दर माणशीं उत्पन्नाचा उच्चांक**—अमेरिकेंतील 'दरमाणसागणिक' वार्षिक उत्पन्नाचा १९४६ मधील आकडा १,२०० डॉलर एवढा आहे. १९४० सालीं तें उत्पन्न ५७७ डॉलर होतें. 'माणसागणिक' ह्यांत पुरुष, स्त्रिया व मुलें, सर्वांचा समावेश होतो. माणशीं उत्पन्नाचें प्रमाण इतकें मोठें ह्यापूर्वी कधींहि नव्हतें.

**जपानी मालाची निर्गत**—जपाननें १६ कोटी डॉलर किंमतीचा माल निर्गतीसाठीं बाजूस काढला आहे. त्यांत ५८ कोटी वार कापड, ३२ कोटी पौंड सूत व ५ लक्ष डझन गंजिफाक आहेत. हिंदुस्थान, ने. ई. इंडीज, तुर्कस्तान व ग्रेट ब्रिटन ह्यांनाच मुख्यतः हा माल मिळणार आहे. अमेरिकेनें जपानला कपास पुरविली, तिचेपासून हा माल बनविण्यांत आला आहे. व्यवहारांत उरणाऱ्या नफ्याचा विनियोग जपानमध्यें ठेवण्यांत आलेल्या लष्कराचा खर्च भागविण्याकडे केला जाईल.

## उत्पादन वाढीच्या कार्यक्रमांत सहकारी संघटनेचें महत्त्वाचें स्थान

### श्री. सरय्या ह्यांनीं घेतलेला आढावा

बॉंबे प्रॉव्हिन्शिअल् कोऑपरेटिव्ह बँकेच्या ३६ व्या साधारण सभेंत, बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं सध्याच्या आर्थिक परिस्थितीसंबंधानें व्यक्त केलेले कांहीं विचार पुढें दिले आहेत. हें भाषण ता. २७ सप्टेंबर १९४७ रोजीं झालें.

हिंदुस्थानला प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचा उल्लेख करून श्री. सरय्या म्हणाले, "गेल्या महायुद्धांत, जीवनाला आवश्यक असणाऱ्या पुष्कळ वस्तूंचा नाश झाला अगर त्यांचा उपयोग युद्धकार्यासाठीं करण्यांत आला. आपणाला ही हानि तर भरून काढावयाचीच आहे; पण त्याशिवाय जातीय दंग्यामुळें उद्भवलेल्या आर्थिक दलदलींतूनही मार्ग काढावयाचा आहे. पदार्थांच्या किंमती वाढल्या कीं वेतन वाढवावें लागतें आणि वेतन वाढविलें कीं किंमती वाढतात. ह्या चक्रांतून मार्ग काढावयाचा असेल तर शेतीच्या व औद्योगिक मालाच्या उत्पादनांत वाढ करणें, एवढा एकच मार्ग आहे. त्यासाठीं सक्त परिश्रम आणि संघटना ह्यांची जरूरी आहे. स्वतंत्र हिंदुस्थानांत सहकारी चळवळीनें महत्वाचें कार्य केलें पाहिजे. सर्व देशभर शेतीची व लहान लहान उद्योगधंद्यांची संघटना उभारून व वाढवून हें कार्य करतां येण्यासारखें आहे.

"युद्धकालांत उद्भवलेले आर्थिक प्रवाह, म्हणजे वाढत्या किंमती, चढतें वेतन आणि अपुरा साठा, अजून तसेच चालू आहेत. सरकारनें युद्धकार्यासाठीं चालविलेला खर्च जवळ जवळ बंद झाला असला आणि १० कोटी रुपयांच्या चलनी नोटा कमी झाल्या असल्या तरी वरील परिस्थितींत फरक पडलेला नाहीं. त्यामुळें शेड्यूल्ड बँकांच्या ठेवीमध्यें वाढ होण्याचें थांबलें. पुढील तक्त्यांत ठेवीसंबंधी आंकडेवार माहिती दिली आहे.

| | प्रसृत चलनी नोटा, आकडे लक्ष रुपयांचे | शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी (आकडे लक्ष रुपयांचे) | | एकुण (आकडे लक्ष रुपयांचे) |
|---|---|---|---|---|
| | | दर्शनी ठेवी | मुदतीच्या ठेवी | |
| युद्धपूर्व १९३८-३९ (ब्रह्मदेश वगळून) | १,७४,३९ | १,२३,८ | १, ३,३० | २,२७,११ |
| जून, २९, १९४५ | ११,३६,९७ | ६,२९,४४ | २,३१,१४ | ८,६८,५८ |
| जून, २८, १९४६ | १२,३७,८४ | ७,०७,८६ | ३,११,४८ | १०,२०,३४ |
| जून, २७, १९४७ | १२,२७,४१ | ६,६७,२६ | ३,४६,४५ | १०,१३,७१ |
| १९३८-३९ पासूनच्या वाढीची टक्केवारी | ६०४ | ४३९ | २३५ | ३४७ |

घाऊक किंमतींचा आणि कामगार वर्गाच्या रहाणीचा निर्देशांक पुढील प्रमाणें आहे.

| | घाऊक किंमतींचा निर्देशांक | मुंबईच्या कामगार वर्गाच्या रहाणीच्या खर्चाचा निर्देशांक |
|---|---|---|
| युद्धपूर्व | १०० | १०६ |
| जून १९४५ | २३७,३ | २३५ |
| जून १९४६ | २६३,५ | २५९ |
| जून १९४७ | २९०,५ | २७८ |
| १९३८–३९पासून झालेल्या वाढीची टक्केवारी | १९०·५ | १६२ |

व्यापाराच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या कांहीं पदार्थांच्या किंमतींत झालेल्या वाढीचा तक्ता पुढीलप्रमाणें आहे.

जून मधील तौलनिक किंमत

| | १९४० | १९४१ | १९४२ | १९४३ | १९४४ | १९४५ | १९४६ | १९४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेंगदाणा, प्रत्येक पल्ल्यास रु. | १२ | १० | १३-८ | ३५ | २८ | २७ | ४० | ५० |
| कापूस, प्रत्येक गाठीस रु. | ७२ | ७५ | ५७ | १६० | ८० | ८० | ९० | ९० |
| गूळ, प्रत्येक पल्ल्यास रु. | १४ | १० | २२ | ४८ | ४५ | ३७ | ४२ | ५२ |
| भात, प्रत्येक मणास रु. | ३ | ४ | ५ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

## कारखाना उभारण्यापूर्वीं किंवा वाढविण्यापूर्वीं सरकारी खात्यांचा सल्ला घ्या

### फॅक्टरी ॲक्टांतील नियोजित दुरुस्ती

फॅक्टरी ॲक्टांत दुरुस्ती करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. कारखान्यांची उभारणी करण्यापूर्वीं त्यांचे नकाशे व बांधणीचा तपशील ह्यांस सरकारच्या तत्संबंधी खात्यांची मान्यता मिळविण्यांत आली पाहिजे आणि ही मान्यता देतांना कामगारांचें आरोग्य व सुरक्षितता ह्यांचाच विचार केला जाईल, असें प्रसिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें, कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या खराब पाण्याचा निचरा व्यवस्थित केला जाण्याविषयींहि कायद्यांत तरतूद होईल. ह्या नियोजित कायद्याचा तपशील अद्याप बाहेर आलेला नाहीं. तथापि, फॅक्टरी इन्स्पेक्टरांच्या कचेरीच्या सल्ल्यानेच जर कारखान्यांची आखणी केली, तर बराच खर्च व गैरसोय हीं टळूं शकतील असें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. ह्या बाबत पत्रव्यवहार चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज, मेन्का बिल्डिंग, औटॅम रोड, कोट, मुंबई, ह्या पत्त्यावर करावा. मुंबई सरकारला आवश्यक वाटलें तर तें हिंदुस्थान सरकारच्या 'चीफ ॲडव्हाइसर, फॅक्टरीज'चा सल्ला घेऊन अर्जदारांना योग्य त्या सूचना करील. सांडपाण्याच्या निचऱ्याबाबत कोणास सल्ला हवा असल्यास त्यांनीं कारखाने उभारण्यापूर्वीं मुंबई सरकारचे पब्लिक हेल्थ इंजिनिअर, सेंट्रल बिल्डिंग्ज, पुणें ह्यांचेकडे चौकशी करावी. वाटेल त्यानें उठून चौकशी व पत्रव्यवहार केला तर सरकारी अधिकाऱ्यांचा वेळ निष्कारण खर्च होईल. ह्यासाठीं, अर्जदारानें कारखाना उभारण्यासाठीं किंवा वाढविण्यासाठीं स्वतः जवळ जागा अगर इमारत असल्या विषयीं अधिकाऱ्यांची खात्री करून दिली पाहिजे; त्याचप्रमाणें कारखान्यास लागणारी यंत्रसामुग्री त्याचे जवळ असल्याचा किंवा ती मागविली असल्याचा दाखला त्यास देता आला पाहिजे. कारखाना उभारणीस किंवा त्याच्या वाढीस आवश्यक त्या खर्चाची तरतूदहि त्यानें सिद्ध केली पाहिजे. जुन्या कारखान्यांना नव्या कायद्याचीं बंधनें कितपत लागू करावयाचीं, हा प्रश्न जरा बिकट असला, तरी त्यांचेवर बंधणें न घालणें सयुक्तिक ठरणार नाहीं, असें मुंबई सरकारनें म्हटलें आहे.

## आपणांपुढील आर्थिक प्रश्न व हिंदी संघराज्याचें धोरण

लेखक: श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए. बी. टी.

गेल्या एक दोन महिन्यांत अर्थशास्त्रज्ञांची व उद्योगपतींची प्रसंगवशांत झालेलीं भाषणें व औद्योगिक कंपन्यांच्या वार्षिक सभेच्या वेळीं झालेलीं भाषणें बारकाईनें वाचलीं असतां त्यांतून आजच्या आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें विचारांना चालना देणारी व सद्यःस्थितीवर प्रकाश पाडणारीं मतें आढळून येतात. सर्व-साधारणरीत्या अपुऱ्या उत्पादनाची तक्रार प्रत्येक भाषणांत आढळून येते, व अपुऱ्या उत्पादनाचें मुख्य कारण म्हणजे मजुरांचे वाढते पगार, कामाचे कमी झालेले तास, कामाबद्दल बेफिकीरपणा, कोळशाची व वहातुकीच्या साधनांची टंचाई व सर्वांत मुख्य कारण म्हणजे १९४७ च्या मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांतील भांडवलाच्या संचयाला व गुंतवणुकीला निरुत्साही करणारी करयोजना, इ. गोष्टी सांगितल्या जातात. वैयक्तिक खाजगी धंद्याची मालकीच आर्थिक उन्नतीला पोषक ठरेल असें मत जोरदार रीतीनें प्रतिपादलें जातें. या सर्व गोष्टी सकृद्दर्शनी खऱ्या वाटतात. तेव्हां हिंदी संघराज्याच्या आर्थिक भवितव्याच्या दृष्टीनें वरील पार्श्वभूमि विचारांत घेऊन एक दृष्टिकोण येथें मांडला आहे.

वरील विचारांच्या जोडीला आपण हेंहि लक्षांत घ्यावें कीं अमेरिकेचे डॉ. ग्रेडी यांनीं अमेरिकन भांडवल योग्य अटीवर हिंदुस्थानला सहज मिळूं शकेल, मात्र तें भांडवल गुंतविलें जाण्याविषयीं केव्हांहि याचना करणार नाहीं, कारण अमेरिकन भांडवल कोणत्याहि स्वार्थी हेतूपासून अलिप्त आहे असें जोरदार भावेंत बजाविलें आहे. अमेरिकेप्रमाणें कॅनडा, ऑस्ट्रेलिया इ. देशहि हिंदुस्थानांत थोडेबहुत भांडवल गुंतविण्यास तयार होतील असें दिसतें. या सर्व घटनांचा विचार करतांना हिंदी संघराज्याचें आर्थिक धोरण काय असावें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

हिंदुस्थानांतील बिकट अन्नपरिस्थिति, आणखी कांहीं वर्षें परदेशांतून अन्न आयात करण्याची आवश्यकता, यंत्रसामुग्री व भांडवली मालाची जरूरी, निरनिराळ्या धंद्यांतील यांत्रिक तज्ज्ञांच्या सल्ल्याची आवश्यकता इ. गोष्टी समुच्चयानें लक्षांत घेतां, आपली परिस्थिति सुधारण्यासाठीं परदेशी मालावर व कांहीं अंशीं परदेशी भांडवलावरहि आपणाला अवलंबून राहावें लागणार असें निश्चितपणें दिसतें. विचाराचा व तत्त्वाचा प्रश्न एवढाच आहे कीं परदेशांतून होणाऱ्या उपर्निर्दिष्ट संभाव्य आयातीच्या बाबतींत स्वतंत्र हिंदी संघराज्याचें धोरण काय असावें.

महायुद्ध संपल्यानंतर निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितींतून डोकें वर काढण्याचा महत्त्वाचा प्रश्न खुद्द इंग्लंड व युरोपांतील निरनिराळीं राष्ट्रें यांसमोरहि आहे. इंग्लंडच्या स्वतंत्र योजना, युरोपमधील राष्ट्रांच्या बाबतींत अमेरिकेची मार्शल योजना इ. तयार आहेत. परंतु स्वातंत्र्य प्राप्त झालें तरी हिंदी संघराज्याचा आर्थिक प्रश्न अद्याप आपल्या सरकारच्या आटोक्यांत आला आहे असें अजून दिसत नाहीं. पुनर्घटनेच्या स्थगित झालेल्या योजना शांततेचें वातावरण निर्माण झाल्याबरोबर योग्य ते फेरबदल करून हातीं घेणें आवश्यक आहे.

परंतु त्या पूर्वीहि हिंदी संघराज्यानें पत्रक काढून परराष्ट्रीय भांडवलाची आयात व उद्योगधंद्यांवर नियंत्रण या दृष्टीनें योग्य ती योजना आंखावी व तिची त्वरित अंमलबजावणी करावी असें वाटतें. या गोष्टी दिरंगाईवर टाकणें परिणामी फायदेशीर होणार नाहींत.

हिंदी संघराज्याला आंतरराष्ट्रीय जगांत स्वतंत्र स्थान प्राप्त झालें आहे. तेव्हां गेल्या तीनशें वर्षांतील आपल्या आर्थिक इतिहासाचा अनुभव लक्षांत घेऊन परदेशीय भांडवलाच्या आयातीबद्दल धोरण निश्चित करावें. भांडवलावर निश्चित व्याजाचा दर देणें व योग्य कालमर्यादेंत परतफेड करणें या गोष्टींची जबाबदारी पत्करण्यासाठी हिंदी संघराज्यानें तयार असलेंच पाहिजे. परंतु भांडवलाची आयात करतांना ते निरुपद्रवी राहील व पुढेमागें त्यामुळें हिंदी आर्थिक जीवनावर प्रतिगामी स्वरूपाचे परिणाम होणार नाहींत याबद्दल योग्य ते निर्बंध ठरवून द्यावें. स्वतंत्र हिंदी सरकारला आपल्या पतीवर या नियमांची अधिकृतरीत्या अंमलबजावणी करतां येईल असें वाटतें.

अंतर्गत आर्थिक उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें, आजच्या परिस्थितींत असें दिसतें कीं सरकारनें खाजगी मालकी, खाजगी उत्पादन, व खाजगी व्यवस्था यांना कांहीं वर्षें तरी उत्तेजनच देण्याचें धोरण स्वीकारावें. कारण, भांडवलदार वर्गाला सांप्रतच्या अडचणीच्या काळांत नाखूष करून चालणार नाहीं. खाजगी मालकी व व्यवस्था उत्पादनाला प्रोत्साहन देते. तेव्हां उत्पादन वाढेपर्यंत खाजगी मालकी चालू ठेवावी. मात्र, एका गोष्टीची सरकारनें विशेष दक्षता बाळगली पाहिजे ती ही कीं कोणत्याहि धंद्यांत मालकाकडून बाजारभाव वाढविण्यासाठीं अपुरें उत्पादन केलें जात नाहीं. सारांश, खाजगी मालकी ठेऊन कारखानदारांना उत्पादन वाढविण्यास हिंदी सरकारनें प्रोत्साहन द्यावें हेंच आजच्या काळांत फायदेशीर ठरेल.

गेलीं दोन तीन वर्षे आंतरराष्ट्रीय संस्थांचा व कल्पनांचा मोठ्या प्रमाणांत विकास होत आहे. हिंदी सरकार प्रत्येक संस्थेचा सभासद आहे परंतु या उदात्त तत्त्वांपासून आपला खरोखरच फायदा किती होतो हें काळच दाखवून देणार आहे. तेव्हां आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सभासदत्वापासून आपला आर्थिक दृष्ट्या फायदा करून घेण्याचें हिंदी सरकारनें धोरण ठरवावें. राजकीय स्वातंत्र्य व लोकशाही यांच्या यशाला आर्थिक परिस्थितीच कारण होत असतें हा अर्वाचीन इतिहासाचा धडा आहे.

आजची परिस्थिति अशी नाजूक झाली आहे कीं कांहीं कल्पनांच्या आहारीं आपण गेल्यास त्यापासून आपली आर्थिक उन्नति होणें कठीण आहे. व्यवहार्यता व सर्वसाधारण जनतेचा जास्तींत जास्त टिकाऊ फायदा हा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून परराष्ट्रीय भांडवल, धंद्यांची खाजगी मालकी, आयात-निर्यात व्यापाराचें धोरण, उत्पादनावर देखरेख व उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न हा सर्व गोष्टी हिंदी सरकारच्या अर्थखात्यानें किंवा पुनर्घटना खात्यानें त्वरित ठरवाव्या.

---

**आयातीवर कडक निर्बंध**—डॉलर्सच्या बचतीसाठी ग्रेट ब्रिटननें सर्व तऱ्हेच्या छापील पुस्तकांच्या व वृत्तपत्रांच्या आयातीवर निर्बंध घातले आहेत. कांहीं फळांची आयात अजिबात बंद केली आहे. महाग भाज्यांच्या आयातीसहि प्रतिबंध केला जाईल.

**ब्रह्मदेशांत मध्यवर्ती बँक** – "युनिअन बँक ऑफ बर्मा" ह्या नांवाची ब्रह्मदेशच्या सरकारची बँक रंगून येथें पुढील महिन्यांत उघडण्यांत येणार आहे. बँकेचें भांडवल ४ कोटी रुपये राहणार असून त्यापैकीं निम्में सरकार उभारणार आहे. ही बँक इतर बँकांची मध्यवर्ती बँक म्हणून काम करणार असून कांहीं व्यापारी व्यवहारहि करणार आहे.

## सहकारी संस्थांचे अहवाल

### श्री लक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

अहवालचे वर्षी वरील बँकेचें खेळतें भांडवल ७½ लक्ष रुपयांनीं वाढून तें ३६ लक्ष, ६२ हजार रु. झालें. भागीदारांना कॅश क्रेडिट स्वरूपांत कर्ज देण्याबाबतचा नवीन उपक्रम सुरू करण्यांत आला आहे. पुणें सें. को. बँकेनें आपल्या नोकरांच्या आपत्ती निवारणासाठी स्वतंत्र फंड काढला, त्याच अनुकरण फलटणच्या बँकेनें करून चालू वर्षी ५०० रु. त्यांत घातले. बँकेस २३,६५३ रु. नफा झाला; गेल्या वर्षीपेक्षा हा आकडा ६,९७१ रुपयांनीं मोठा आहे. भागिदारांना ६¼% डिव्हिडंड + ३⅛% बोनस = एकूण ९⅜% डिव्हिडंड मिळेल. श्री. वि. शं. झिरपे, बी. ए., एल-एल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. श्री. ह. तळवळकर हे व्यवस्थापक आहेत.

### दि कराड अर्बन को. बँक लि.

वरील बँकेची प्रगति कायम चालू आहे. अहवालाचे वर्षी कर्जें कमी होऊनहि बँकेचें खेळतें भांडवल वाढलें आहे. जंगममाल तारणाचे व्यवहारासाठी गोडाऊन इमारतीचा नकाशा तयार असून लोखंडी सामानाची तो वाट पहात आहे. १९,०१७ रु. निवळ नफ्यापैकीं ७½% डिव्हिडंडला ७,४६० रु. लागतील. श्री. ना. बा. बुधकर, बी. ए., एलएल. बी. हे चेअरमन असून श्री. सिताराम कृष्ण एकांडे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### दि को. पीपल्स बँक लि., लिंब ( जि. सातारा )

१९३० मध्यें स्थापन झालेल्या ह्या संस्थेची प्रगति सालोसाल निश्चित होत आहे. बँकेच्या खर्चाचें मान प्रारंभापासूनच अत्यंत काटकसरीचें आहे. ३ लक्ष, ५७ हजारांच्या उलाढालीसाठीं फक्त ८४५ रु. म्हणजे शेकडा चार आणे हें प्रमाण अत्यंत अल्प आहे. बँकेच्या काटकसरी व कार्यक्षम कारभाराचें श्रेय बँकेचे कर्तव्यनिष्ठ सेक्रेटरी श्री. अभ्यंकर ह्यांस आहे. बँकेचें शेअरभांडवल ७,१५० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ७ हजारांचे आहेत. नफा १,२०३ रु.झाला. ६% डिव्हिडंडला ४२४ रु.लागतील. गेलीं तीन वर्षें नियंत्रित पदार्थांच्या खरेदीविक्रीचें काम बँकेकडे होतें, परंतु "गुंतणारें भांडवल, पडणारे श्रम, मोडणारा वेळ, लोकापवाद, अखेर शिल्लक रहाणारा नफा, सहकारी धोरण, जनतेची अपेक्षा, ह्या गोष्टी विचारांत घेऊन बँकेनें सहकारी दुकानाचा राजीनामा दिला आहे." लिंब सारख्या आडवळणी गांवांतहि सहकारी बँक आपल्या सभासदांसाठी किती सेवा करूं शकते, ह्याचें पीपल्स बँक हें उत्कृष्ट उदाहरण आहे आणि त्याबद्दल श्री. त्रिं. मा. ठाकूर ( अध्यक्ष ) व श्री. बा. ग. अभ्यंकर ( सेक्रेटरी ) हे अभिनंदनास पात्र आहेत.

### श्री महावीर को. बँक लि, कोल्हापूर

वरील बँकेच्या पटावर आतां ७४३ सभासद असून शेअर भांडवलाची रकम ५१,०९० झाली आहे आणि शिल्लक फंडस् ४२,३१४ रुपयांचे आहेत. एकूण खेळतें भांडवल सुमारें ५½ लक्ष रुपये झालें आहे. बँकेच्या जयसिंगपूर शाखेचें कामहि समाधानकारक चालू आहे. बँकेचा खर्च ४,००० रु. वाढूनहि नफा कमी झालेला नाहीं. बँक प्रारंभींपासूनच "अ" वर्गांत आहे. ९,९३५ रु. च्या निवळ नफ्यापैकीं ३८२३ रु. ७½% डिव्हिडंडला लागतील. श्री. गंगाराम सिदाया चौगुले हे चेअरमन असून श्री. डी. बी. शेटे. बी. ए., हे मॅनेजर आहेत.







शेअर्स विकणें आहेत.

डुप्लीकेटर्स, शटल्स, प्रोसेस व फोटोग्रॅफिक कॅमेरे व इतर बऱ्याच प्रकारची उंची मशिनरी तयार करणारे सुप्रसिद्ध

मेसर्स शेवडेज कॅमेरा वर्क्स लि., बेळगांव.

यांचे विक्रीस काढलेले प्रत्येकीं १० रुपयांचे २०,००० शेअर्सपैकीं फारच थोडे शेअर्स विकाऊ आहेत.

अर्ज व इतर माहितीसाठी खालील पत्त्यावर लिहाः—

आर. जे. सावंत
शेअर्स व स्टॉक ब्रोकर्स
६२, न्यू स्टॉक एक्स्चेंज बिल्डिंग,
अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

सासाहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संहित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ३०।९।४७ | बुधवार १।१०।४७ | गुरुवार २।१०।४७ | शुक्रवार ३।१०।४७ | सोमवार ६।१०।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३११०-८; २५२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १६६७-८ | १८२० | | १८२२-८ | १९२२-८ |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३४२ | ३६६ | | ३६८ | ३८४ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगॉल स्टील | १० | २५-८ | २७-४ | | २८-२ | २८-८ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३२-१२ | ३५-६ | | ३५-६ | ३५-६ |
| ३२७७-८; २१३२-८ | १२-८-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०७५ | ११३७-८ | म. गांधी जयन्तीनिमित्त बाजार बंद | ११९३-१२ | ११३५ |
| १[illegible]०; ६५८ | ६-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५५९ | ५९२ | | २७८ | ५८७ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५८९ | ६२१ | | ६११ | ६१० |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर. | १०० | २९४ | ३११ | | ३१५ | ३२० |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०६ | ३१३ | | ३११-८ | ३११ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३३३ | ३४४ | | ३४४ | ३४२ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २४१ | २५० | | २४२ | २४३ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-०-७ | ४-२ | | ४-२-६ | ४-२ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-७ | १५-१५ | | १६-० | १६-३ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | „ डिफर्डस् | १ | २-१४-७ | ३-०-० | | ३-०-९ | ३-१ |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५७२-८ | ५५५ | | ५९२-८ | - - ५९५ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १३४-८ | १७० | | १६५-८ | १६५-१२ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७२ | २७५ | | २७५ | २७५ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४८० | ४९७-८ | | ४९१-४ | ४९५ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३२-३ | ३४ | | ३४-११ | ३४-१४ |

## विमा आणि व्यापार

( नवें मराठी मासिक )

श्री. पांडुरंग सीताराम काणे ह्यांचे संपादकत्वाखालील वरील मराठी मासिकाचा सप्टेंबर, १९४७ चा पहिला अंक प्रसिद्ध झाला आहे. विमा प्रचारकांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळावी, विमा व्यवसाय वाढीस लागावा, विम्याचा फायदा समाजाच्या जास्तींत जास्त घटकांस मिळणें सोपें जावें, इत्यादि अनेक हेतु हें मासिक सुरू करतांना संपादकांनीं नजरेसमोर ठेवले आहेत. विमा विषयावरोबर सर्वसाधारणपणें व्यापारविषयक व बँकिंगचीहि माहिती प्रत्येकास असणें आवश्यक आहे, ह्या दृष्टीनें बँकिंग तसेंच कारखाने, कंपन्या व व्यापारविषयक महत्त्वाचे लेख वेळोवेळी देण्याची संपादकांची योजना आहे. महाराष्ट्रीयांस व्यापार व उद्योगधंदे ह्यांची गोडी लागू लागली आहे, आणि त्यांस योग्य मार्गदर्शन व्हावें ह्या दृष्टीनें उपयुक्त वाङ्मयाची आवश्यकता आहे. ही गरज भरून काढण्यासाठीं श्री. काणे ह्यांनीं उपक्रम केला आहे, त्याचें आम्हीं मनःपूर्वक स्वागत करतो.

### श्री. दांडेकर जर्मनींत गेले.

महायुद्धांतील मदतीच्या मोबदल्यांत हिंदुस्थानला जर्मनींत मिळालेल्या यंत्र सामुग्रीची तपासणी करण्याकरतां हिंदुस्थान सरकारच्या मशिन टुल्स अिन्स्पेक्शन खात्यांतील एक अधिकारी भिवंडीच्या सुप्रसिद्ध दांडेकर घराण्यांतील श्री. चिं. दा. दांडेकर बी. ई. हे दिनांक ६ सप्टेंबर १९४७ रोजीं तिकडे विमानानें गेले. भिवंडीच्या दांडेकर मशिन वर्क्स लि. च्या नोकर वर्गातर्फे त्यांना ता. ६ सप्टेंबर रोजीं प्रेमाचा निरोप देण्यांत आला.

**इटली-बल्गेरिआ व्यापारी तह**—बल्गेरिआचें एक शिष्ट मंडळ इटालीशीं व्यापारी तह करण्यासाठीं रोमला जाणार आहे, असें समजतें. युद्धापूर्वी जर्मनीच्या खालोखाल बल्गेरिआंत इटलिअन मालाची आयात होत असे.

**अणुशक्तीचें अधिक संशोधन**—कॅन्सर रोगाचें संशोधन आणि अणुशक्तीचें संशोधन करण्यासाठीं जगांतील सगळ्यांत मोठे 'सायक्लोट्रॉन' नांवाचें यंत्र शिकॅगो येथें तयार करण्यांत येत आहे. हें संशोधन शिकॅगो विद्यापीठांत होणार असून त्यासाठीं १ कोटी, २० लाख डॉलर्स मंजूर करण्यांत आले आहेत. अणु-बॉंब संबंधींचे प्राथमिक प्रयोग प्रथम ह्याच विद्यापीठांत झाले होते.

**जर्मन-युगोस्लाव्ह करार**—इंग्लंड-अमेरिकेनें व्यापलेला जर्मनीचा भाग आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार नुकताच करण्यांत आला. ह्या करारान्वये जर्मनीनें युगोस्लाव्हिआला औद्योगिक यंत्रसामुग्री पुरवावयाची असून त्याच्या मोबदला युगोस्लाव्हिआनें खनिज धातू, लाकूड आणि अन्नधान्यें द्यावयाची आहेत.

**केळ्यासंबंधीं संशोधन केंद्र**—मद्रास प्रांतांत लावण्यांत येणाऱ्या केळ्यांची जात सुधारण्याच्या दृष्टीनें मद्रास सरकारच्या शेतकी खात्यानें एक संशोधन केंद्र उभारण्याचें ठरविले आहे. मुख्य केंद्राला जोडूनच दोन दुय्यम केंद्रे शेतकरी वस्तीच्या भागांत उघडण्यांत येणार आहेत. संशोधन केंद्राला ३ लाख रुपये खर्च येणार आहे. मद्रास सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे त्यासाठीं मदतीची मागणी केली आहे.

**राजपुतान्यांत तेलाचा शोध**—हिंदुस्थानचें मध्यवर्ती सरकार लवकरच राजपुतान्यांत व काठेवाडांत भूमिगत तेल सांपडते कीं काय हे पहाण्यासाठीं संशोधन हातीं घेत आहे. ह्या कामी परदेशीय तज्ज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे. मध्यवर्ती सरकार ब्युरो-ऑफ माइन्स ह्या नांवाची एक संघटना प्रस्थापित करणार असून तिच्या मार्फतच तेल शोधण्याचें काम चालणार आहे. सध्या ह्या संघटनेला मुख्यतः सल्लामसलतीचेच अधिकार देण्यांत यावयाचे आहेत.

### वेस्टर्न इंडिया ला. इन्शुअरन्स कंपनी लि., सातारा
### ( पुणें शाखा )

नामदार नरहर विष्णू उर्फ काकासाहेब गाडगीळ, वीज, खाणी व बांधकाम खात्याचे स्वतंत्र हिंदुस्थान सरकारचे मंत्री, यांचा वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनीचे पुणें शाखेतर्फे व युनायटेड वेस्टर्न बँकेतर्फे ता. २६-९-४७ शुक्रवार रोजीं सकाळीं १० वाजतां कंपनीचे शाखा कचेरींत सत्कार करण्यांत आला. सदर प्रसंगी कंपनीचे हितचिंतक प्रिं. धनंजयराव गाडगीळ, सकाळचे संचालक डॉ. ना. भि. परूळेकर, डायरेक्टर्स श्री. आबासाहेब नातु व डी. पी. जोशी, एजंट मंडळींपैकीं श्री. केशवराव जोशी, गोळे बंधू, व्ही. डी. साठे, कृ. ल. फडणीस, एस. आर. देशपांडे, सौ. म्हसकर वगैरे प्रमुख मंडळी उपस्थित होती.

सुरवातीस कंपनीचे शाखाअधिकारी श्री. कृ. ग. खांडेकर, एम्. ए. यांनी ना. काकासाहेब गाडगीळ यांचे गुणवर्णनपर स्वागत केले. कंपनीचा व श्रीयुत काकासाहेब यांचा परिचय फार जुना असल्याचें त्यांनीं निदर्शनास आणिलें.

नंतर प्रिं. धनंजयराव गाडगीळ यांनीं श्री. काकासाहेब यांना जो हल्लींचा बहुमान मिळाला तो त्यांचा अहर्निश उद्योग व प्रयत्न यांचें फळ असल्याचें विस्तृत करून सांगितलें.

कंपनीचे डायरेक्टर, डॉ. आबासाहेब नातु यांनीं कंपनीचे मुख्य ऑफिस सातारला असल्यामुळें व काकासाहेब यांना सवड नसल्यामुळें सातारा येथें सत्कार होणें उचित असतांना पुणें शाखेंत समारंभ उरकून घेणें जरूर पडलें असें निदर्शनास आणलें. सातारा व पुणें या दोन गावांत थोडें अंतर आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी महाराष्ट्राची गेली १५०-२०० वर्षांची परंपरा लक्षांत घेतां या दोन्ही शहरांत तसा फरक मानला जात नसल्यामुळें या शाखेनें केलेला सत्कार हा मुख्य कचेरीचाच आहे, असें सर्वांनीं मानावें असें सुचविलें.

उत्तरादाखल बोलतांना श्री. काकासाहेब यांनीं, ज्या ज्या वेळीं माझे सल्ल्याची जरूर लागेल त्या त्या वेळीं मी आनंदानें देत राहीन व उन्नत्तीसाठीं सर्व प्रयत्न करीन असें सांगितलें.

पुष्पहार, पानसुपारी, अत्तरगुलाब वगैरे झालेनंतर शेवटीं सर्व उपस्थित मंडळींचे कंपनीतर्फे आभार मानून राष्ट्रगीत होऊन हा छोटासा पण टुमदार समारंभ समाप्त झाला.

---

### आंतरराष्ट्रीय व्यापारी धोरणांत खुल्या व्यापारास तात्विक मान्यता

जागतिक व्यापाराचे कृत्रिम अडथळे दूर करण्यासाठी, जिनीव्हा येथें इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या सनदेचा मसुदा पांच महिन्यांच्या परिश्रमानें एकदाचा आतां तयार झाला आहे. ७०० प्रतिनिधींनीं ४५५ वेळां सभा भरवून केलेल्या विचारविनिमयाचें तें फळ आहे. " आय. टी. ओ. " ची घटना सामान्यतः संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेप्रमाणेंच असावी, असें ठरलें आहे. खुल्या व्यापारास तत्वतः मान्यता दिली असली, तरी 'आय. टी. ओ.' च्या देखरेखीखालील संरक्षणाच्या योजनांस प्रतिबंध नाहीं. अमेरिकेनें ब्रिटिश धोरणाशीं अशा प्रकारें थोडें जुळतें घेतलें आहे. मागसलेल्या देशांनीं भरमसाट जकाती ठेवता कामा नयेत. त्यांना उद्योगधंद्यांत पुढारलेले देश सहाय करतील. मतदान पद्धति, बिगर सभासदांशीं संबंध, इंटरनॅशनल कोर्टाशी नातें आणि कार्यकारी मंडळाचें सभासदत्व, ह्या चार प्रश्नांचा विचार हॅवाना येथें नोव्हेंबरमध्यें केला जाईल.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें.

वसूल झालेलें भांडवल रु. १६,००,०००

रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,९०,०००

चेअरमन—श्री. धों. कृ. साठे

**शाखा:**—डेक्कन जिमखाना ( पुणें ), खडकी, मुंबई ( फोर्ट व गिरगांव ), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर ( पे ऑफिस ), नागपूर ( सिताबर्डी ), रत्नागिरी, कोपरगांव हुबळी, सोलापूर व कल्याण.

★सोलापूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची व्यवस्था केली आहे.

★चालू खात्यांवर द. सा. द. शें. ½ टक्का व्याज दिलें जातें. मात्र दर सहा महिन्यास कमीत कमी व्याज पांच रुपये झालें पाहिजे.

★सेव्हिंग्ज खात्यांत द. सा. द. शें. १॥ टक्का प्रमाणें व्याज दिलें जातें.

★मुदती ठेवींची रक्कम तीन वर्षांच्या मुदतीपर्यंत स्वीकारली जाते. व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचें काम केलें जातें.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



मराठींतील व्यापारविषयक प्रमुख मासिक

अंकास १ रुपया ] **व्यापार-उद्योग** [ वा. व. १० रुपये

संपादक : अविनाश मोहाडीकर.　　सल्लागार : प्रो. द. रा. घारपुरे.

**पहिला अंक प्रसिद्ध झाला**

यशस्वी व्यापार उद्योग ( ले. दादासाहेब मावळणकर ), भारताचा औद्योगिक भाग्योदय ( ले. केशवराव गोखले ), कांच धंद्याचें परीक्षण, देशांतील गंभीर आर्थिक परिस्थिति, शेती, शेअरबाजार, इ. माहितीपूर्ण लेख पहिल्या अंकांत वाचा. शिवाय, नामदार काकासाहेब गाडगीळ, पंतप्रधान बाळासाहेब खेर, सेनापति बापट, सानेगुरुजी, महर्षि कर्वे, लोकनायक अणे, डॉ. जयकर, डॉ. खरे, श्री. स. का. पाटील, नामदार तपासे, स्पीकर श्री. फिरोदिया आदींचे मार्गदर्शक संदेश, व्यापार विषयक बातम्या व माहिती. आकर्षक रंगी मुखपृष्ठ.

आजच वर्गणीदार व्हा. ठिकठिकाणीं एजन्ट्स् नेमणें आहेत.

लिहा : **मोहाडीकर बंधु, व्यवस्थापक, व्यापार उद्योग,** १० गंगानिवास, रानडेरोड, दादर ( बी. बी. ) मुंबई १४.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.